लोकमत

# हिवाळी सत्रातील परीक्षांचे आजपासून भरावेत अर्ज

## शिवाजी विद्यापीठ : ३१ ऑगस्टपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ऑक्टो/नोव्हे. हिवाळी सत्रातील परीक्षांचे अर्ज आज, सोमवारपासून भरता येणार आहेत. यासंबंधीची परिपत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शुक्रवारी काढले.

विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर अर्ज विलंब शुल्कासहित भरावा लागणार आहे. विद्यार्थ्यांना २ ते ६ सप्टेंबर या कालावधीत ५० रुपये विलंब शुल्कासहित तर ८ ते ११ सप्टेंबर या कालावधीत ५० ते ३०० रुपयांपर्यंतच्या अतिविलंब शुल्कासहित अर्ज भरता येईल. विद्यापीठातील ५५८ अभ्यासक्रम व इतर सर्टिफिकेट कोर्ससाठी २० ऑक्टोबरपासून परीक्षा सुरू होणार आहेत. याबाबतचे प्राथमिक वेळापत्रक परीक्षा विभागाने २६ जुलैला जाहीर केले होते.

### ६२८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. आजअखेर ६२८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.

पुण्यनगरी

# जी-२० संकल्पनेवरील रिल्सचे विद्यापीठात सादरीकरण

## मास कम्युनिकेशन विभागाचा उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एमए मास कम्युनिकेशन विभागामध्ये जी-२० संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रिल्सचे सादरीकरण झाले. विद्यापीठातील जी-२० उपक्रमाचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीत हा कार्यक्रम झाला.

जी-२० गटाचे अध्यक्षपद यंदा भारताकडे आहे. या पार्श्वभूमीवर देशभर विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ प्रशासनाने मास कम्युनिकेशन विभागाकडे जी-२० संकल्पनेवर आधारित रिल्स मेकिंग उपक्रमाची जबाबदारी दिली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांनी परिषदेच्या विकास मुद्द्यांना अनुसरून रिल्स तयार केल्या होत्या.

शाश्वत विकास उद्दिष्टे, पर्यावरणातील बदल, अन्न सुरक्षा आणि तृणधान्य, तसेच भरड धान्य लोकप्रिय करणे, हरित जगाला आकार देणारे ऊर्जा संक्रमण, पर्यावरणातील हरित वाढ, पर्यावरणपूरक जीवनशैली, विकासासाठी डेटाचा उपयोग, साहित्य आणि पर्यावरण यातील सुसंगतता या विषयांवर विद्यार्थ्यांनी ३०, ६० व ९० सेकंदांच्या रिल्स तयार केल्या होत्या. रिल्स मेकिंग उपक्रमामध्ये सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. पन्हाळकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन श्रेया देशमुख हिने, तर आभार साई सिमरन घाशी हिने मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.